PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Dhagala Lagli Kal
Year: 1985

Song: Deva Hanumanta Dhava Dhava
Lyricist:

देवा हनुमंता धावा पावा
देवा हनुमंता धावा पावा
वेळ असा निर्वाणीचा
अंत नका पाहू आता
देवा हनुमंता धावा पावा

मी काय तुम्हाला सांगावे
दुनियेतील काय भले नि बुरे
जरी सारे कळते तुम्हाला
चुपचाप कसे बघता सारे
तुम्हा विणा आम्हा कुणा
तुम्हा विणा आम्हा कुणा
कोण असे हो त्राता
देवा हनुमंता धावा पावा

जरी वेळ टळूनिया जाईल ही
अन् याल जरी भलत्या वेळी
जरी वेळ सरूनिया जाईल ही
अन् याल जरी भलत्या वेळी
तर संपून जाईल खेळ पुरा
हक नाक कुणी जाईल बळी
तुम्हावरी उरेतरी
तुम्हावरी उरेतरी
दोष तयाचा पुरता
देवा हनुमंता धावा पावा

या पुण्य इथे पेरायाला
या पाप पुरे जाळायाला
या दुबळयांना सांभाळाया
या दुष्टांना संहाराया
तुम्ही तया करा दया
तुम्ही तया करा दया
या हो या भगवंता
देवा हनुमंता धावा धावा
देवा हनुमंता धावा धावा
धावा पावा धावा पावा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*